# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक 422 222

जा. क्र.: यचममुवि/विसेवि/शिष्य/2023-24/118/195 **परिपत्रक** दि. 07/07/2023

**शासनामार्फत राबविल्या जाणा-या शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करणेबाबत..**

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सत्र 2023-24 ची शासनाच्या महाडिबीटी संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची प्रक्रिया दि. 01.07.2023 रोजी सुरू होणार असून, उपरोक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घ्यावयाचा असल्यास अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना तसे नमूद करणे आवश्यक असून, ऑनलाइन अर्ज सादर करतानाच काही दस्तऐवजांची पूर्तता करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीसंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या याच संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमध्ये देण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी ही माहिती वाचावी.

**संचालक,**
**विद्यार्थी सेवा विभाग**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

**कुलसचिव**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

प्रत : 01. मा. कुलगुरू कार्यालय,

02. मा. संचालक, सर्व विद्याशाखा

03. मा. संचालक, सर्व विभागीय केंद्र

आपल्या विभागातील अधिनस्त असलेल्या अभ्यासकेंद्रांना सदर परिपत्रकाद्वारे सूचित करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याबाबत अभ्यासकेंद्रांना प्रोत्साहित करावे.

04. मा. केंद्र प्रमुख/केंद्रसंयोजक, सर्व अभ्यासकेंद्र

आपल्या अभ्यासकेंद्रावरील शिष्यवृत्तीसाठी इच्छुक असणा-या व पात्र असणा-या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करण्याबाबत आपल्या अभ्यासकेंद्रावरील दर्शनी भागातील सूचना फलकावर सदर परिपत्रक प्रसिद्ध करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याबाबत प्रोत्साहित व मार्गदर्शन करावे.